राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण, परिषद, पुणे, महाराष्ट्र

# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा

सन २०२२-२३

**गट क्र.४: विषय सहाय्यक, विषय साधन व्यक्ती, समावेशित साधन व्यक्ती, विशेष साधन व्यक्ती, विशेष शिक्षक व ग्रंथपाल गट**

**-: शीर्षक :-**

## कथासरिता

-: सादरकर्ता :-

**श्रीम. वैशाली दामोदर काकडे**

(विषय सहाय्यक)

प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई

# परिचय



| | |
|---|---|
| स्पर्धकाचे नाव - | श्रीम. वैशाली दामोदर काकडे |
| कार्यालयाचे नाव - | प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई |
| कायमचा पत्ता- | ट्विंकल टॉवर्स, ठाणे |
| जन्मतारीख- | २४/०९/१९७७ |
| एकूण सेवा- | २४ वर्षे |
| शैक्षणिक अहर्ता - | एच. एस. सी. डी. एड.<br>बी. ए .बी. एड.<br>एम. ए. एम. एड. |
| नवोपक्रम शीर्षक - | कथासरिता (ज्ञानसागराच्या भेटीसाठी चला प्रवाही होऊया...) |
| पृष्ठ संख्या - | ३५ |
| ई-मेल आयडी - | vghuge24@gmail.com |

# ऋणनिर्देश

प्रस्तुत नवोपक्रम सादरीकरणात नवोपक्रम करताना अनेकांची मदत झाली.
त्यांच्याविषयी ऋण व्यक्त करणे हे नवोपक्रमकर्ता आपले आद्य कर्तव्य मानतो. त्यांच्या सहकार्य व प्रेरणेमुळेच नवोपक्रमकर्त्यास नवोपक्रम सादर करणे शक्य झाले.

या उपक्रमासाठी प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबईच्या उपसंचालक, मनीषा पवार यांच्याकडून मला प्रेरणा मिळाली. या नवोपक्रमासाठी वरिष्ठ अधिव्याख्याता तथा व्यवसाय मार्गदर्शन अधिकारी संघमित्रा त्रिभुवन यांचे मार्गदर्शन मिळाले. समुपदेशक अर्चना जोशी यांचे सहकार्य मिळाले.
प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई येथील सर्व अधिकारी विषय सहाय्यक समुपदेशक विषय साधन व्यक्ती यांची नवोपक्रमास मदत झाली.

कथा सरिता उपक्रमातील सर्व सदस्य, उपक्रमात सहभागी सर्व शिक्षक, विद्यार्थी  शिक्षण प्रेमी, माझे पती सुधाकर व मुलगा प्रज्वल यांचाही सहभाग मोलाचा आहे.
नवोपक्रम पूर्ततेसाठी सहाय्यभूत ठरलेल्या सर्व मदतीच्या हातांचे मनस्वी आभार. धन्यवाद!

नवोपक्रमकर्ता

**श्रीम. वैशाली काकडे**

विषय सहाय्यक
प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | नवोपक्रमाचे शीर्षक | 1 |
| २ | परिचय | 2 |
| ३ | ऋणनिर्देश | 3 |
| ४ | अनुक्रमणिका | 4 |
| ५ | प्रस्तावना | 5-9 |
| ६ | नवोपक्रमाची गरज व महत्व | 10-12 |
| ७ | नवोपक्रमाची उद्दीष्टे | 13 |
| ८ | नवोपक्रमाचे नियोजन | 14-19 |
| ९ | नवोपक्रमाची कार्यपद्धती | 20-22 |
| १० | नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पत्ती | 23-24 |
| ११ | समारोप | 25 |
| | संदर्भ ग्रंथ सूची व परिशिष्ट | 26-35 |

# प्रस्तावना


महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे
यांचे विभागीय कार्यालय,
प्रादेशिक विद्या प्राधिकरण,मुंबई
प्रस्तुत करीत आहे.
''कथा सरिता''
३६५ दिवसांकरीता रोज एक कथा......
''ज्ञान सागराच्या भेटीसाठी चला प्रवाही होऊ या...''
विद्यार्थी व सर्व जनसमुदायासाठी...
दि.१ मे २०२१ पासून सकाळी ११ वाजता दररोज एक नवीन गोष्ट.
'' प्रादेशिक विद्या प्राधिकरण,मुंबई '' या
You tube channel वर
Plz like,share & subscribe

शिक्षण हे एकमेव उन्नतीचे साधन आहे. असे महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणतात परंतु कोरोना या जागतिक संकटामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी अस्वस्थता निर्माण झाली. शिक्षणाबाबत विद्यार्थी शिक्षक आणि पालकांसाठी हा आव्हानात्मक काळ होता. अनेक अडचणींना सामोरे जावे लागले.

शालेय अभ्यासाच्या पलीकडे जाऊन ही विद्यार्थी सतत काही ना काही शिकतच असतो. या सततच्या शिकण्याला आपण शालेय अभ्यासाची जोड दिली तर हे अभ्यासापलीकडचं शिकणं अधिक समजपूर्वक आणि सखोल विस्तृत होऊ शकतं. सर्व औपचारिक शिक्षण क्षेत्राचा पायाभूत केंद्रबिंदू म्हणजे शालेय शिक्षण प्रत्येक बालकावर योग्य वयात योग्य संस्कार रुजवण्यासाठी शालेय औपचारिक शिक्षणाबरोबर सहशालेय उपक्रमांची बांधणी करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शालेय शिक्षण व्यवस्थेत उपक्रमांची बांधणी करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शालेय शिक्षण व्यवस्थेत आयोजन केले जाते हे सहशालेय उपक्रम विविध प्रकारचे घेतले जातात जसे वर्ग सजावट, बाल आनंद मिळावे, वाढदिवस साजरा करणे, अनुभव कथन ,सोहळा ,क्रीडा स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन ,शैक्षणिक सहली ,संस्कारक्षम व्याख्याने विविध थोर महात्म्याच्या जयंती व पुण्यतिथी साजरी करणे ,पथनाट्य अशा अनेक उपक्रमांचे आयोजन शाळेत दरवर्षी राबविले जाते .या उपक्रमाच्या यादीतील एक महत्त्वपूर्ण उपक्रम म्हणजे कथाकथन होय.

कथा म्हणजे सांगणे निवेदन करणे, कथन पासून कथा शब्द प्रचलित झाला. कथेचाच दुसरा अर्थ गोष्ट सांगणे. लहान थोरांपासून सर्वांनाच कथा व गोष्ट जवळची आहे आणि ते जगात सर्वदूर परिचित आहे.

कथाकथन ही ज्ञानप्राप्तीची प्राचीन पद्धती आहे. आजी आजोबा आपल्या नातवंडांना परींच्या कथा, महापुरुषांच्या कथा, पौराणिक कथा, साहस कथा सांगत असत कथाकथनातून हास्य निर्मिती, बोधनिर्मिती, मूल्य निर्मिती, संस्कार निर्मिती घडून येत असे. लहान मुलांना कथांची फार ओढ असते. ते वारंवार कथा सांगण्याचा आग्रह धरतात. बालकांचे अवधान प्रदीर्घकाळ टिकून ठेवण्याचे सामर्थ्य कथेमध्ये असते. गोष्टी ऐकायला आवडत नाहीत असे मूल सापडणे अवघड. बालपणात गोष्टी सांगितल्या गेल्याच पाहिजेत .गोष्टी हे करमणुकीचे माध्यम आहे ,असे आपल्याला वाटत असले तरी त्यातून खूप प्रभावीपणे संस्कार होतात.

बालपणापासून बालक त्यांच्या घरातून प्राण्यांची,पक्षांच्या गोष्टी ऐकत मोठा झालेला असतो जसजसा बालकांचा विकास होत जातो तस तसे त्यांच्या गोष्टींचेही भावविश्व बदलत जाते. गोष्टीचा आशय बदलत जातो .प्राचीन काळापासून अनुभवाच्या आधारे जन्मास आलेली कथा मानवी जीवनाच्या सांस्कृतिक विकासास हातभार लावत मनोरंजनाचे एक साधन बनलेले दिसून येते .जसजशी मानवी अनुभवाला कल्पकतेची जोड मिळत गेली तस तशी मानवी अनुभवाला कल्पकतेची जोड मिळत गेली तसतशी कल्पनारम्य कथा बहरत गेलेले आहे .आपल्या भारत देशातील कथा विश्व समृद्ध असून ऋग्वेद, वैदिक, वाङ्मय रामायण महाभारतातील कथा ,काव्य ,पंचतंत्र ,हितोपदेश, संस्कृत ,पाली भाषेतील साहित्यांमधील विविध बोधकथा, जैन धर्मातील नीतीकथा ,बौद्ध जातक कथा, विक्रम वेताळ, सिंहासन बत्तीसी ,अकबर बिरबलाच्या कथा, तेनाली रामाच्या कथा ,चाचा चौधरी ते अद्भुत रहस्यमय कथा, युद्ध कथा अशा विविध रंगी गोष्टी मानवी संस्कारासाठी प्रभावी ठरलेल्या आहेत

या सर्व गोष्टी व कथा आपल्याला भेटतात त्या तीन माध्यमातून

**अ) श्रवण - कथाकथन गोष्ट सांगणे निवेदन इत्यादी सांगणे व**

**ब) दर्शन - नाट्य चित्र इत्यादी माध्यमातून म्हणजेच दृक स्वरूपात प्रगटीकरण**

**क) वाचन -अनेक ग्रंथ पुस्तके म्हणजेच लिखित साहित्यातून**

जशी कथा माध्यमातून समोर येते तसेच तिचा अविष्कार अनेक रूपात दिसून येतो. प्रत्येक रूप हे वैशिष्ट्यपूर्ण असते म्हणून प्रत्येक कथा मानवी भाव विश्वाला वळण लावण्यात हातभार लावते आणि सहशालेय उपक्रमातून ते सहज साध्य होते कोविडच्या कालावधीत शाळा बंद पण शिक्षण सुरू या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू होते परंतु बालमनाला विरंगुळा देणारे सहशालेय उपक्रम म्हणून प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई प्रस्तुत ऑनलाइन कथासरिता उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. ज्ञानासोबत सुसंस्कार आणि सकारात्मकता निर्माण करून बालकाच्या भावविश्व उभारणीस हातभार लावणारा हा उपक्रम दिनविशेष नुसार प्रत्येक दिवसाचे महत्त्व लक्षात घेऊन ऑडिओ व्हिडिओ माध्यमातून विविध कथा, गोष्टी प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई या यूट्यूब चैनल वर कथासरिता हा उपक्रम ज्ञानसागराच्या भेटीसाठी चला प्रवाही होऊया या टॅग लाईन सह सुरु करण्यात आला. सदर उपक्रम युट्युब चॅनेल वर प्रसारित होत असल्यामुळे विद्यार्थी पालक शिक्षक इतर जनसमुदाय यांना सोयीनुसार बघता येणार आहे.

बालकांच्या ज्ञानवृद्धी सोबत मनोरंजन करणे विविध कथांद्वारे लहान बालकांपासून कुमारवयीन मुलांपर्यंत योग्य चांगले संस्कार उजळणी आणि नवनवीन ज्ञान पोहोचवून त्यांना विचार प्रवर्तक करणे हे या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. रोज एक कथा याप्रमाणे ३६५ दिवसांकरिता या उपक्रमाचे आयोजन यूट्यूब च्या माध्यमातून प्रसारित करण्यात आले.

**कथा सरिता उपक्रमाचे पाच प्रकारात वर्गीकरण करण्यात आले**

**अ:- मनोरंजनात्मक कथा**

**ब:- वैज्ञानिक कथा**

**क:- पर्यावरण विषयक कथा**

**ड:- ऐतिहासिक कथा**

**इ:- समाज सुधारक व विचारवंतांच्या कथा**

आठवड्यातील एक दिवस मानवी कल्याणासाठी वैशिष्ट्यपूर्ण योगदान देणाऱ्या कर्तुत्ववान नारीशक्तीच्या कथा यांचा समावेश होता. तसेच आठवड्यातील शुक्रवार हिंदी कथा सादरीकरण रविवार इंग्रजी कथा सादरीकरण व उर्वरित वार हे मराठी कथा सादरीकरणाचे होते.

कथासरिता या उपक्रमाची सुरुवात दि.१ मे २०२१ महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून सकाळी ११ वाजता गोष्ट प्रसारित करण्यात आली व वर्षभर सुरु असणाऱ्या या उपक्रमाची सांगता दि.३० एप्रिल २०२२ रोजी करण्यात आली.

कथा सरिता बजेट शून्य (झीरो बजेट) उपक्रम असून मानवी जीवनात कोविड महामारी मुळे अनेक कठीण प्रसंग येत होते पण या कठीण प्रसंगी योग्य बोध घेऊन जीवनातील यशाच्या मार्गक्रमणात कथासरिता हा उपक्रम मदतगार व यशस्वी ठरला याचा मनस्वी आनंद आहे.

# २. गरज व महत्त्व

कोरोना महामारीच्या जागतिक संकटामुळे अभूतपूर्व आणि असामान्य अशी परिस्थिती निर्माण झाली होती.  शैक्षणिक प्रक्रियेवरही अभूतपूर्व परिणाम झाले होते शाळा कॉलेज प्रत्यक्ष बंद झाले होते.

विद्यार्थी हा शिक्षणाच्या मूलभूत हक्कापासून वंचित राहू नये म्हणून ऑनलाईन शिक्षणाचा मार्ग निवडण्यात आला होता त्यामुळे विद्यार्थ्यांना घरीच बसून ऑनलाइन शिक्षण घेणे अनिवार्य झाले होते. ऑनलाईन शिक्षण विद्यार्थ्यांना कितपत पचनी पडते हा यक्ष प्रश्न होता परंतु काळाच्या मागणीनुसार शिक्षणाने ऑनलाइन रूप धारण केले. दूर शिक्षण, माहिती तंत्रज्ञानाचा वापर, युट्युब, हँग आउट, मल्टीमीडिया, मोबाईल फोन, दूरदर्शन, गुगल क्लासरूम इत्यादी माध्यमातून

शाळा बंद पण शिक्षण आहे. ही अभ्यास माला स्वयंशिक्षणासाठी पर्यायी शैक्षणिक दिनदर्शिका जिओ टीव्हीवरील चार माध्यमांमधून विद्यार्थ्यांसाठी इयत्ता ३री ते १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कार्यक्रम जिओ सावन या रेडिओ वाहिनीवरील कार्यक्रम, डी डी सह्याद्री वाहिनीवरील इयत्ता १ली ते ८वीच्या विद्यार्थ्यांसाठी टिली मिली अशा अनेक उपक्रमातून विद्यार्थ्यांचे शिकणे सुरू होते, तरीदेखील कोरोना काळात शिक्षणाबाबत विद्यार्थी शिक्षक आणि पालकांसाठी हा एक आव्हानात्मक काळ होता. डिजिटल युगात मुलांच्या शैक्षणिक विश्वात आश्वासक अनपूरक असे काय पर्याय देऊ शकतो याचा पाठपुरावा सुरू केला गोष्ट आणि मुलं यांचे नातं अगदी जवळच, याच नात्याचा उपयोग करून गोष्टी खेळ आणि ॲनिमेशन आदींचा डिजिटल शिक्षणात उपयोग करणारा कथासरिता हा ऑनलाइन उपक्रम सुरु करण्यात आला.

मोरोपंत म्हणतात कथा या गाई किंवा आई पेक्षाही श्रेष्ठ असतात कारण गाई केवळ आपल्या वासराला पाहून पाणवतात परंतु कथांचा पान्हा शिशु असो अथवा वृद्ध सर्वांसाठीच दाटतो. गोष्टी सांगणे हा प्रकार आज जरी जुन्या काळातील वाटत असला तरी गोष्टींची शक्ती यात किंचितही कमी झालेली नाही फक्त काळाप्रमाणे गोष्ट सांगण्याचे

प्रकार व माध्यमिक बदलली आहेत केवळ वाचन किंवा श्रवण हेच एक माध्यम राहिलं नाही तर चल चित्रांच्या माध्यमातून अधिक आकर्षक रीतीने सांगता येतात.

गोष्ट ऐकल्याने किंवा वाचल्याने कल्पनाशक्तीचा विकास होतो आपण त्या व्यक्ती व घटना दृश्य रूपाने कल्पित करतो व त्यामुळे विचारशक्तीच्या कक्षा रुंदावतात प्रत्येक व्यक्तीच्या मनात तीच गोष्ट ऐकून वेगवेगळी दृश्य उभी राहतात प्रत्येक व्यक्ती त्या कथेला वेगळ्यापद्धतीने पाहत असते.

गोष्टी नुसत्या सांगण्याशिवाय आपण काही कलात्मक पद्धतीने त्या मुलांना अधिक रंजक करून सांगू शकतो यामुळे मुलांमध्ये वेगळा उत्साह आणि कुतूहल निर्माण होते ते अधिक एकाग्रतेने गोष्टी ऐकतात.

कथाकथन किंवा कथा वाचन हे इतरांशी संवाद साधण्याचं आणि आपले विचार व्यक्त करण्याचं एक माध्यम आहे घटना आणि विविध माध्यमांमधून मिळालेली माहिती आपण एकत्रित करून जेव्हा सांगतो तेव्हा त्या वास्तव असल्यासारख्या वाटतात.

मुलांच्या शिकण्यात गोष्टी खेळासोबत अॅनिमेशनचाही सहभाग होतो जेणेकरून मुले आपल्या कल्पना अॅनिमेशनच्या सहाय्याने व्यक्त करताना दिसतात .त्यांना शिकण्याची गोडी निर्माण होते कार्टून्स आवडणाऱ्या प्रत्येक मुलाला आपल्या शिक्षणाचा अभ्यासक्रमाही त्याच धर्तीवर समोर आला किंवा अभ्यासाला तर त्याला शिकण्याची गोडी लागते मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळते, आत्मविश्वास वाढतो मुलांना शाळेपासूनच कल्पकता नाविन्यता आणि नवनिर्मिती करता प्रोत्साहित केले तर डिजिटल युगातील शिक्षणाची आव्हाने ते सहज पेलू शकतील गोष्टींमधून व्यक्त होण्याचा प्रयोग सोशल मीडियावर सर्वाधिक प्रभावी ठरतो आहे, तसेही मुले मोठ्यांपेक्षा अधिक सजगपणे आणि ॲक्टिव्हली सोशल मीडिया, मोबाईल हे तंत्रज्ञानाचा वापर करतात. त्यामुळे नेट स्टोरी त्यांना अधिक चांगल्या पद्धतीने अवगत असते मुलांना नव्या तंत्रज्ञानाचे कुतूहल असते आणि नवे तंत्रज्ञान आपल्याला आलेच पाहिजे किंबहुना वापर करता आला पाहिजे. याकरता ते आग्रही असतात नव्या डिजिटल युगात विद्यार्थी व पालक यांच्यासाठी हे प्रभावी माध्यम आहे.

जर्मन नाटककार फ्रेटैग यांनी उत्तम गोष्टींचे पाच भाग वर्णले आहेत.

प्रदर्शन/प्रस्तावना, जटिलता, चरम, परावर्तन व मुक्तता. शेक्सपियरच्या सर्व रचना साधारण याच साच्यात बसतात मेंदूमध्ये कुठले रासायनिक बदल होतात ज्यामुळे आपल्यावर त्यांचा अधिक प्रभाव पडतो यावरही मानसशास्त्रज्ञांनी बरेच संशोधन केले आहे गोष्टी ऐकताना विशेषतः प्राण्यांच्या गोष्टी ऐकताना आपल्या मेंदूत ऑक्सिडीसीन नावाच्या रसायनाचे स्रवण होते हे रसायन प्रेम सहानुभूती व संवेदनशीलता निर्माण करते त्यामुळे पंचतंत्राच्या व इसापनीतीच्या गोष्टी फार प्रभावी आढळून येतात या गोष्टी मधल्या तणावाच्या क्षणांमध्ये कॉर्टीसील नावाचे रसायन उत्पन्न होते व हे रोमांचक अनुभूतीस जबाबदार आहे. विरतेच्या देशभक्तीपूर्ण गोष्टी या भावनेचा प्रत्यय आणतात सुखद अंत असलेल्या गोष्टी डोपामिन नावाच्या रसायनाचे स्रवण घडवून आणतात ज्यामुळे आपल्याला प्रसन्न व आशावादी वाटते व आत्मविश्वास सुद्धा वाढतो.

# ३. नवोपक्रमाची उद्दिष्टे

- विद्यार्थ्यांचा भाषिक कौशल्यांचा विकास करणे.
- विद्यार्थ्यांची शब्दसंपदा वाढविणे.
- विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे.
- श्रवण वाचन लेखन कौशल्य विकसित करणे.
- गोष्टी ऐकवून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणे.
- विद्यार्थ्यांचे संभाषण कौशल्य विकसित करणे.
- विद्यार्थ्यांना कथांच्या माध्यमातून सर्जनशील बनविणे.
- विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती प्रबळ बनविणे.
- विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढविणे.
- मनोरंजनात्मक पद्धतीने विद्यार्थ्यांना अभ्यासाची गोडी लावणे.
- मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी गोष्टी वाचणे, ऐकणे, पाहणे उपयुक्त आहेत.
- कथा सरिता उपक्रम हा दृकश्राव्य असल्यामुळे विद्यार्थ्यांचे वाचन, आकलन सुलभ होण्यास मदत होणार आहे
- कथा या वाड.मय  प्रकाराला दीर्घ परंपरा लाभली आहे श्रवणीयता, मनोरंजन व प्रबोधन ही कथा प्रकाराची उल्लेखनीय वैशिष्ट्ये आहेत.

# ४. नवोपक्रमाचे नियोजन

**i) उपक्रम पूर्वस्थितीचे निरीक्षण**

शाळा बंद पण शिक्षण सुरू या उपक्रमांतर्गत राज्यातून अनेक ऑनलाइन शिक्षणाच्या संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या होत्या प्रत्यक्ष शाळा बंद होत्या परंतु शिक्षण सुरू होते त्यामुळे विद्यार्थ्यांचा विषयनिहाय अभ्यासक्रम सुरू होता मात्र विद्यार्थ्यांचे हसत खेळत सहशालेय उपक्रमांसोबत शिकणे व्हावे डिजिटल प्लॅटफॉर्मवर आश्वासक आणि पूरक असे काय पर्याय देऊ शकतो याचा मागोवा घेतला आणि त्यातून विद्यार्थ्यांना काय आवडेल याचा विचार करत असताना विद्यार्थ्यांना खेळ, गाणी, गोष्टी, कार्टून्स आवडतात हे सर्वश्रुत आहे. या सर्वांचा एकत्रितपणे मेळ घालून विद्यार्थ्यांचे शिक्षण रंजक कसे होईल याचा विचार करत असताना विद्यार्थ्यांना गोष्टी सांगण्याचा, कथाकथन करण्याचा विचार मनात आला. त्यामुळे ज्ञानसागराच्या भेटीसाठी चला प्रवाही होऊया या टॅग लाईन सह कथासरिता या उपक्रमाची कल्पना सुचली.

## ii) संबंधित व्यक्तींशी तज्ञांशी चर्चा

प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई मधील सर्व अधिकारी, विषय सहाय्यक, विषय साधन व्यक्ती, समुपदेशक यांची ऑनलाईन सभा घेण्यात आली आणि कथासरिता या उपक्रमाबाबत माहिती देण्यात आली. सर्वांना हा उपक्रम खूप आवडला.

उपक्रमाचे नियोजन व कार्यवाही याबाबत चर्चा व नियोजन करून प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई कडून कथासरिता उपक्रम राबविण्यासाठी माननीय संचालक SCERT पुणे यांच्याकडे मंजूरीसाठी पाठवण्यात आला

उपक्रमाला मंजूरी मिळताच कथा सरिता उपक्रमात सहभागी अर्थात गोष्ट सांगण्याची आवड व गोष्ट सांगण्याची कला अवगत असणाऱ्या प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई मधील अधिकारी, अधीक्षक, विषय सहाय्यक, समुपदेशक, विषय साधन व्यक्ती यांची निवड करण्यात आली.

## iii) आवश्यक साधनांचा विचार

कथा सरिता हा उपक्रम online आल्यामुळे स्मार्टफोन, लॅपटॉप, इंटरनेट सुविधा, गोष्टींची पुस्तके, कथाकथन करणाऱ्या व्यक्ती, कथा सरिता मधील गोष्टी युट्युब वर प्रसारित करण्यासाठी तंत्रस्नेही टीम इ. बाबींची आवश्यकता होती.

## iv) करावयाच्या कृतींचा क्रम

- कथासरिता उपक्रमात कथाकथन करण्यासाठी कथाकथनकारांची निवड करणे.
- निवडलेल्या कथाकथनकारास संपूर्ण महिन्याचे गोष्टींचे नियोजन देणे. (गोष्ट कोणती कोणत्या तारखेला सांगणार याबाबत)
- कथा सरिता उपक्रम सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी व्हाट्सअप, फेसबुक या माध्यमाच्या द्वारे पोस्टर, पोस्ट व लिंक च्या माध्यमातून जाहिरात करणे.
- गोष्टीचा आशय व सादरीकरण तपासण्यासाठी (गोष्ट प्रसारित होण्यापूर्वी) पुनरावलोकन समिती निर्मिती करणे.

## v) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण

कथा सरिता हा उपक्रम सन २०२१ - २२ मध्ये कोरोना कालावधीमध्ये राबविला. विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन अभ्यासाबरोबर सहशालेय उपक्रमातून नैतिक मूल्य जोपासण्याचा हेतू विद्यार्थी, शिक्षक, पालक यांच्या युट्युब कमेंट्स, अभिप्राय, फोनकॉल, व्हाट्सअप चॅट द्वारे साध्य झालेला दिसून आला.

कथा सरिता उपक्रमामुळे अनेक विद्यार्थी, शिक्षक, शिक्षण प्रेमी यांना गोष्टी सांगण्यासाठी प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई यांचा कथासरिता हा ऑनलाइन प्लॅटफॉर्म उपलब्ध झाला. यामध्ये शिक्षण क्षेत्रातील अधिकारी, शिक्षक, पालक व विद्यार्थी यांनी आपला सहभाग नोंदवला.

## vi) कार्यवाहीचे टप्पे वेळापत्रक

| अ. क्र. | | कार्यवाहीचे टप्पे | तपशील |
|---|---|---|---|
| १ | | नवोपक्रम निश्चिती | दिनांक १५ /०४/२०२१ |
| २ | | कार्यालयातील वरिष्ठांशी चर्चा | दिनांक १५ /०४/२०२१ |
| ३ | | ऑनलाईन बैठक ( अधिकारी, समुपदेशक, विषय सहाय्यक, साधन व्यक्ती ) | दिनांक २२ /०४/२०२१ |
| ४ | | साधनांची उपलब्धता | दिनांक २२/०४/२०२१ |
| ५ | | व्हॅट्सऍप ग्रुप निर्मिती | |
| | १ | कथासरिता सदस्यांचा ग्रुप | दिनांक २३/०४/२०२१ |
| | २ | कथासरिता पूर्वावलोकन | दिनांक २५/०४/२०२१ |
| ६ | | कथासरिता सराव | कथा प्रसारणापूर्वी साधारण एक आठवडा |
| ७ | | कथासरिता प्रसारण | दररोज ३६५ दिवस |
| ८ | | उपक्रमोत्तर निरीक्षण (कथासरिता कारांशी ऑनलाईन चर्चा) | प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात |
| ९ | | अहवाल लेखन | दिनांक ०१/०५/२०२१ - ३०/०४/२०२२ |

## vii) उपक्रमासाठी इतरांची मदत

- सदर उपक्रम प्रभावी होण्याकरिता अनेकांची मदत महत्वपूर्ण ठरली.
- वरिष्ठांचे मार्गदर्शन - सदर उपक्रमासाठी वरिष्ठ अधिकारी, माझे सहकारी, विषय सहाय्यक, समुपदेशक, विशेष व विषय साधन व्यक्ती यांची मदत झाली.
- महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून शिक्षक, विद्यार्थी व शिक्षण प्रेमी या सर्वांच्या सहभागामुळे कथासरिता उपक्रम यशस्वी होऊ शकला.
- कथा सरिता उपक्रमामध्ये ५५ सदस्यांमार्फत कथा सांगण्यात आल्या.
- पुनरावलोकन समिती - पुनरावलोकन समिती तयार करण्यात आली. यात माननीय उपसंचालक, माननीय व्यवसाय मार्गदर्शन अधिकारी, कार्यालयातील समुपदेशक यांचा सहभाग होता. ही समिती कथा सरिताचे अवलोकन करून आपला अभिप्राय नोंदवून योग्य त्या सुधारणा करून गोष्ट प्रसारित करण्यात आली.
- तांत्रिक सहाय्य - पुनरावलोकन समितीकडून कथा तपासून झाल्यानंतर प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई या यूट्यूब चैनल वर प्रसारित करण्याचे महत्त्वाचे काम श्रीमती मानसी भोसले, श्री शिवाजी रेनापुरे, मृणाल पोतदार, ऋत्विज जोशी यांनी केले.

## viii) उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे

- ऑनलाइन मीटिंग चे इतिवृत्त
- ग्रुप निर्मिती
- सर्व गोष्टी प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबईच्या यूट्यूब चैनल वर उपलब्ध आहेत
- लिंक खाली दिली आहे

https://youtube.com/@user-co7wk9fo4n

# ५. नवोपक्रमाची कार्यपद्धती

## i) पूर्वस्थितीचे निरीक्षण व नोंदी

शाळा बंद पण शिक्षण सुरू या उपक्रमांतर्गत राज्यातून अनेक ऑनलाइन शिक्षणाच्या संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या होत्या प्रत्यक्ष शाळा बंद होत्या परंतु शिक्षण सुरू होते त्यामुळे विद्यार्थ्यांचा विषयनिहाय अभ्यासक्रम सुरू होता मात्र विद्यार्थ्यांचे हसत खेळत सहशालेय उपक्रमांसोबत शिकणे व्हावे डिजिटल प्लॅटफॉर्मवर आश्वासक आणि पूरक असे काय पर्याय देऊ शकतो याचा मागोवा घेतला आणि त्यातून विद्यार्थ्यांना काय आवडेल याचा विचार करत असताना विद्यार्थ्यांना खेळ, गाणी, गोष्टी, कार्टून्स आवडतात हे सर्वश्रुत आहे. या सर्वांचा एकत्रितपणे मेळ घालून विद्यार्थ्यांचे शिक्षण रंजक कसे होईल याचा विचार करत असताना विद्यार्थ्यांना गोष्टी सांगण्याचा, कथाकथन करण्याचा विचार मनात आला. त्यामुळे ज्ञानसागराच्या भेटीसाठी चला प्रवाही होऊया या टॅग लाईन सह कथासरिता या उपक्रमाची कल्पना सुचली.

## ii) कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन

कथा सरिता हा उपक्रम ३६५ दिवस रोजची दिनविशेषनिहाय सादर होणारी गोष्ट असा उपक्रम होता. प्रास्ताविकात लिहिल्याप्रमाणे विविधांगी गोष्टींचा यामध्ये समावेश करण्यात आला होता. विद्यार्थी, शिक्षक, पालक, शिक्षणप्रेमी व इतर जनसमुदाय यांना हा उपक्रम आवडत होता. हे गोष्टींच्या व्ह्यूज, कमेंट्स, व्हाट्सअप मेसेज, फोन कॉल याद्वारे कार्यालयातील सादरकर्त्याला समजत होते. त्यानंतर अनेक विद्यार्थी, पालक, विद्यार्थी व शिक्षण प्रेमी यांनी कथासरिता या उपक्रमात कथा सांगण्याची इच्छा व्यक्त केली परंतु सर्वांना संधी देणे शक्य नव्हते. म्हणून कथासरिता उपक्रमाच्या काही नियमावलीसह एक गुगल फॉर्म देण्यात आला. त्या गुगल फॉर्म मध्ये एका दिवसात १०२ एन्ट्री आल्या पैकी कथा सरिता च्या नियमावलीत बसणाऱ्या एकूण बारा लोकांना सादरीकरणाची संधी देण्यात आली.

### iii) उपक्रम पूर्ण झाल्यावर ची निरीक्षणे

कथा सरिता उपक्रम १ मे २०२१ रोजी सकाळी ११ वाजता सुरू करण्यात आला. दररोज एक दिनविशेषनिहाय कथा प्रसारित होत होती. यामध्ये मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचा समावेश होता. सदर उपक्रमाची औपचारिक सांगता ३० एप्रिल २०२२ रोजी करण्यात आली. या उपक्रमाचा प्रत्यक्ष सांगता समारंभ करण्यात आला. यामध्ये सहभागी असणारे सर्व कथा सरिता सदस्य, निमंत्रित पाहुणे यामध्ये मुंबईमधील बी.एड. कॉलेजच्या प्राचार्य, प्राध्यापक, डायटचे अधिकारी यांनी या उपक्रमाबाबत गौरवोद्गार काढले तसेच SCERT मधील अधिकारी, अधिव्याख्याता, महाराष्ट्रातील शिक्षक, पालक, विद्यार्थी यांनीही कथासरिता या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक केले. **कथासरिता उपक्रम 43 हजार इतक्या लोकांपर्यंत पोहोचला असून या चॅनलचे साडेसहा हजार पेक्षा जास्त सबस्क्रायबर आहेत**

### iv) कार्यवाही करताना आलेल्या अडचणी

- शाळा बंद पण शिक्षण सुरू या उपक्रमांतर्गत अनेक ऑनलाईन उपक्रम सुरू होते त्यामध्ये कथासरिता ह्या ऑनलाइन उपक्रमाची जाहिरात करणे व सर्वांपर्यंत पोहोचविणे.
- तांत्रिक अडचणी -
  - व्हिडिओ जास्त एमबी चा झाल्यामुळे वेळेत व लवकर अपलोड न होणे.

    - कथा सादरकर्त्याच्या काही अडचणीमुळे दिलेल्या वेळेत व्हिडिओ उपलब्ध न होणे त्यासाठी कथासरिता मधील इतर सदस्यांना आयत्यावेळी कथासरितासाठीची सर्व तयारी करणे.
    - कथा सादरकर्त्याला तंत्रस्नेही टीम कडे वेळेवर (व्हिडिओ अपलोड करण्यासाठी) व्हिडिओ पाठवण्यास येणाऱ्या तांत्रिक अडचणी.
    - कथा सरिता उपक्रम हा झीरो बजेट असल्यामुळे वायफाय व इतर गोष्टींसाठी कार्यालय व स्वतःचे नेट उपलब्ध असलेल्या परिसरातच कथासरिता उपक्रमाची तयारी करणे.
- कथा सरिता सदस्यांना त्यांचे कार्यालयीन कामकाज सांभाळून उर्वरित वेळेत उपक्रमाची तयारी करणे.

## ६. नवोपक्रमाची नवीनता/ यशस्विता

कथा सरिता हा उपक्रम ३६५ दिवसांचा असून तो कधीही न संपणारा वर्षानुवर्ष मार्गदर्शक असा उपक्रम आहे. दिनविशेष निहाय उपक्रम असल्यामुळे महिना, वार, वर्ष बदलले तरी वर्षातील दिनविशेष, सण, समारंभ, विशेष बाबी घडामोडी, कार्य कर्तुत्ववान थोर पुरुष, महिला, यांचे कार्य पुण्यतिथी, जयंती निमित्त अधोरेखित होते.

सदर उपक्रमाचा लाभ मर्यादित स्वरूपाचा नसून बालक, पालक, शिक्षक, शिक्षण प्रेमी थोडक्यात समाजातील प्रत्येक घटकासाठी उपयुक्त आहे.

कथा सरिता उपक्रमामध्ये प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई मधील अधिकारी, विषय सहाय्यक, विषय साधन व्यक्ती, समुपदेशक यांच्यासह महाराष्ट्रातील शिक्षण विभागातील अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी यांचाही सहभाग आहे.

कथा सरिता उपक्रम दररोज प्रसारित होत असल्यामुळे शालेय परिपाठासाठी दैनिक विशेष माहिती सांगण्यासाठी शिक्षक विद्यार्थ्यांना उपयुक्त आहे.

## i. कथा सरिता उपक्रमाचा मला झालेला फायदा

- संभाषण कला विकसित झाली.
- तंत्रस्नेही बनले (व्हिडिओ निर्मिती, बॅकग्राऊंड म्युझिक, बॅकग्राऊंड थीम)
- गोष्टी निवडीसाठी वाचन करावे लागते त्यामुळे वाचनाची आवड वृद्धिंगत झाली ज्ञानात भर पडली.
- कथाकथनाचे कौशल्य विकसित झाल्यामुळे आकाशवाणी साठी वृत्तनिवेदक कामासाठी विचारणा झाली .
- निवेदन व सूत्रसंचालनाच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या
- प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई आयोजित व्यावसायिक वाटा प्रगतीच्या दिशा या यूट्यूब चैनल वर मुलाखती घेण्याची संधी मिळाली
- कथाकथन रंजक होण्यासाठी चारोळी निर्मिती करण्याचे कौशल्य विकसित झाले
- कविता निर्मितीची आवड निर्माण होऊन कवितांचे लेखन झाले
- लेखनाची आवड निर्माण झाली

# ७. समारोप

वॉल्ट डिस्नी यांनी एके ठिकाणी असे सांगितले आहे की, कथेच्या, गोष्टीच्या स्वरूपात एखादी गोष्ट आपण सांगितली तर त्यांच्या कल्पना विश्वाला वाव मिळतोच शिवाय कल्पनाविस्तार होण्यास मदत होते, हीच थीम पकडून मुलांना त्यांच्या कल्पना विश्वाला वाव देण्याची पुरेपूर संधी कथासरिता या उपक्रमातून देऊ केली मुलांना शिकविण्याकरिता गोष्टी सांगणे, त्यांना समजेल अशा शब्दात मांडणी करणे, यासारखा सोपा मार्ग नाही.

मानसशास्त्रज्ञ गोष्टी सांगण्याच्या शिक्षण पद्धतीला लहान मुलांच्या मनाशी जोडताना असे सिद्ध करतात की गोष्ट ही मानवी मनाच्या नातेसंबंधांचे कांगोरे उलगडणारी किंवा तसे नाते प्रदान करणारी ठरते.

कथा ही मानवाला नैतिक मूल्यांकडे घेऊन जाणारी आहे. म्हणूनच डिजिटल युगात मुलांच्या शैक्षणिक विश्वात आश्वासक अन पूरक असे काय पर्याय देऊ शकतो? याचा पाठपुरावा करत असताना गोष्ट आणि मुलांचे नाते अगदी जवळचे आहे. हाच धागा पकडून डिजिटल शिक्षणात खेळ, ॲनिमेशन बरोबर विविध गोष्टी सांगण्याचा ३६५ दिवसांचा अखंडित कथा सरिता प्रवाह १ मे २०२१ रोजी सुरू झाला आणि सर्व उद्दिष्ट पूर्तीसह दिनांक ३० एप्रिल २०२२ रोजी या उपक्रमाची औपचारिक रित्या सांगता करण्यात आली.

# ८. संदर्भसूची व परिशिष्टे

## i) संदर्भ



- शब्द शिल्प  - अमोल कावळे
- प्रथम बुक्स चे स्टोरी विवर
- कखग प्रकल्प
- e.sakal.com
- आंतरजाल  - गुगल



## ii) परिशिष्टे


- मनीषा पवार, उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई.
- संघमित्रा त्रिभुवन, वरिष्ठ अधिव्याख्याता तथा व्यवसाय मार्गदर्शन अधिकारी, मुंबई.
- मृणाल पोतदार, अधीक्षक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई.
- अर्चना जोशी, समुपदेशक प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई.
- यतीन पोळ, समुपदेशक प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई.
- विनोद घोरपडे, समुपदेशक प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई.
- अनुजा कदम, समुपदेशक प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई
- नम्रता परब, विषय सहाय्यक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई
- सविता गायकवाड, विषेश साधन व्यक्ती प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई
- प्रियांका चौधरी, विशेष साधन व्यक्ती प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई.
- आशा शिंदे, विशेष साधन व्यक्ती प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई.
- संजय गुरव, विषय साधन व्यक्ती, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई
- शारदा मोरे, विषय साधन व्यक्ती प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई
- शितल शिर्के, विषय साधन व्यक्ती, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई
- सुप्रिया कुरुंदवाडकर, विशेष साधन व्यक्ती प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई


- मानसी भोसले, पनवेल जि. रायगड.
- सुजाता रेम्बळकर, मुंबई शहर.
- सारिका रघुवंशी, पनवेल, जिल्हा रायगड
- सुशील जाधव, रत्नागिरी.
- राम माळी, पालघर.
- अनिता पाटील, ठाणे.
- आसावरी दोषी, मुंबई.
- संपदा पोळ, अंबरनाथ, जि. ठाणे.
- निकिता कदम, बदलापूर, जि. ठाणे.
- सुवर्णा कदम, बदलापूर, जि. ठाणे.
- मीना फुलपगारे, पनवेल, जिल्हा रायगड.
- अमोल पेन्सलवार, ठाणे.
- वर्षा ठोंबरे, वसई, पालघर.
- रंजना राम भिसे, डहाणू, पालघर.
- राम भिसे, डहाणू, पालघर.
- साईशा वैभव परब, मुंबई.
- प्रज्वल उत्तम जेडगुले, मुंबई.
- जयश्री मोहिते, पनवेल, रायगड.
- श्रीकांत पाटील, सिंधुदुर्ग.
- चित्रलेखा जाधव, पनवेल.
- उमेश खिराडे, पालघर,
- मनीषा पवनारकर, महाड, रायगड.
- सुरभी पवार, मुंबई.
- सुवर्णा कुलकर्णी, बुलढाणा.
- विलास पाटील, रायगड.

- पिनेश जाधव, पालघर.
- सारीश शेळके, डोंबिवली.
- डॉक्टर नलिनी गायकवाड, मुंबई.
- जुई कुलकर्णी, पुणे.
- अक्षता उपरे, पनवेल रायगड.
- सुनिता लहाने, अमरावती.
- संतोष नाटेकर, कर्जत.
- रोहिणी दांडगे, ठाणे.
- प्रकाश पारखे, संगमनेर.
- मोहिनी भगरे, नाशिक.
- अनिता खडके, लातूर.
- शिल्पा कुलकर्णी, ठाणे.
- मनीषा कडव, मुंबई.
- मीता तांबे, मुंबई.
- यथार्थ भोसले, पनवेल, रायगड.


7:46 PM
१४ जुलै ची गोष्ट - बोलणारी नदी
1.2K views 1 yr ago ...more
प्रादेशिक विद्या प्राधिकरण... 6.53K
129
Share
Remix
Comments 52


7:49 PM
५ मे २०२१ ची कथा- झाशीची राणी
1.9K views 1 yr ago ...more
Try YouTube Kids
An app made just for children.
Open app
प्रादेशिक विद्या प्राधिकरण... 6.53K
195
Share
Download


7:53 PM
Comments
याची देही याची डोळा अनुभवला
शिवराज्याभिषेक सोहळा ! अप्रतिम वर्णन, छान
सादरीकरण. सोहळाप्रतिपदित करण्याची संधी
म्हणजे वैशाली तुझे भाग्यच आहे.... अभिनंदन
1
Anjali Jogi • 1 yr ago
अतिशय सुंदर कथा सादरीकरण, प्रत्यक्ष
शिवराज्याभिषेक सोहळा अनुभवला.धन्यवाद.
5
Priti Pawar • 1 yr ago
👌👌👌अतिशय सुंदर व खूपच छान माहिती
दिलीत. मॅडम 🙏
छत्रपती शिवाजी महाराज की जय 🙏
4


7:47 PM
शुक्रवार
दि.10 सितंबर
2021
Comments
Namrata Darekar • 1 yr ago
अतिशय सुंदर सादरीकरण,चित्रीकरण,
कथाकथन.....गणेश उत्सव बद्दल संपूर्ण
भारतात साजऱ्या केल्या जाणाऱ्या पद्धतीचे
छान वर्णन!!!अप्रतिम..100... Read more
6
Akshata Ajit • 1 yr ago
बहुत ही अच्छा सादरीकरण
श्री गणेश चतुर्थी की बहुत बहुत
शुभकामनाए
4
Manasi Milind • 1 yr ago
सुंदर सादरीकरण
गणपती बाप्पा मोरया

* कथासरिता उपक्रमाची उपयोगिता *

* उपक्रमात सहभागी शिक्षकाचे नाव - श्रीमती रोहिणी गंगाधर दांडगे (प्रा.शि)
शाळेचे नाव - जि.प. प्रा.शा. बारबंगला कें. कसारा
ता. शहापूर जि. ठाणे.

प्रादेशिक विद्या प्राधिकरण प्रस्तुत कथासरिता या उपक्रमातील सर्वच भाग अतिशय नाविन्यपूर्ण पद्धतीने, आशयबद्ध, आकर्षक चित्रांची मांडणी, सखोल माहिती असलेले दर्जेदार होते.

आम्ही आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांना दैनंदिन परिपाठात कथासरिताचे भाग दाखवत होतो. त्यातून विद्यार्थ्यांना त्या दिवसांचे पंचांग, तिथी आणि दिनविशेष समजले. विद्यार्थ्यांना आज कुठली नवीन गोष्ट ऐकायला, पाहायला मिळेल या बद्दल नेहमीच उत्सुकता वाटे. या उपक्रमातून अनेक थोर महापुरुष, समाजसुधारक व शास्त्रज्ञांची माहिती मिळाली. विशेषत: वैशाली काकडे मॅडम यांनी सांगितलेल्या गोष्टी विद्यार्थ्यांच्या मनात घर करून राहिल्या.

एक शिक्षक म्हणून या उपक्रमात सादरीकरणाची सुवर्णसंधी मिळाली आणि हा गोष्टींचा खजिना आमच्या पर्यंत पोहचविला त्या बद्दल प्राधिकरणाचे मनापासून आभार!

धन्यवाद.

मुख्याध्यापक
जि.प. प्राथ. शाळा, बारबंगला,
केंद्र-कसारा, ता. शहापूर, जि. ठाणे.

उपक्रमात सहभागी शिक्षकाचे नाव.
श्रीम. रोहिणी गं. दांडगे

ता. पनवेल, जि. रायगड

नाव : सौ. अक्षता अजित उपरे

शाळा : रा.जि.प. शाळा आकुर्ली ता. पनवेल
जि. रायगड

## कथासरीता उपक्रमाबाबत अभिप्राय :-

'कथासरीता' हा प्रादेशिक विद्याप्राधिकरण मुंबई चा उपक्रम कोरोना सदृश्य परिस्थितीमध्ये सुरु झाला. कोरोनाजन्य परिस्थिती असल्याने शाळा बंद होत्या. कोणत्या न कोणत्या माध्यमातून मुलांपर्यंत पोहोचणे गरजेचे होते. म्हणून मी ऑनलाईन शिक्षणाचे माध्यम वापरण्यास सुरुवात केली होती. तंत्रज्ञानाची एवढी माहिती नव्हती पण जसे जमेल तसे व्हिडीओ निर्मितीचे माझे काम चालूच होते. अशातच वैशाली मॅडमची कथासरीता या उपक्रमातील कथा पाहिली. सहजच त्यांना माझे तयार केलेले व्हिडीओ मी पाठवले. त्यांना ते आवडले त्यांनी लगेच मला या उपक्रमात सहभागी व्हाल का असे विचारले. मी पण क्षणाचाही विलंब न करता हो म्हणाले. कारण कोणत्याही माध्यमातून मला मुलांपर्यंत पोहोचायचे होते.

कथासरीता या उपक्रमाची संकल्पना खरच खूप छान होती. सर्वप्रथम वार, दिनांक, पंचांग, दिनविशेष व नंतर त्या दिनविशेषास अनुसरून ~~श्र~~ एक कथा. त्यामुळे त्या दिवसाचे महत्व मुलांना समजायचे. या उपक्रमाच्या सदस्य झाल्यावर वर्षभरामध्ये तब्बल ७ कथांची निर्मीती माझ्याकडून झाली. याचे सारे श्रेय मी उपक्रमासच देईन. सतत video निर्मीती करीत राहिल्याने Technical बऱ्याच गोष्टींचे ज्ञान मिळाले. आत्मविश्वास वाढला. माझ्या शाळेतील विद्यार्थीसुध्दा माझ्या कथा पाहत असत. ३री तील २ विद्यार्थीनींनी उपक्रमात सहभागी होण्याची इच्छा दर्शविली. म्हणून वैशाली मॅडमकडून १ Date मागितली. २. ३री च्या विद्यार्थीनी असूनही त्यांनी उत्तम प्रकारे गोष्ट सादरीकरण केले. त्यांचा आत्मविश्वास खरच वाखाणण्याजोगा होता. या उपक्रमामुळे माझ्याबरोबरच त्यांनाही खूप फायदा झाला. त्यांचा आत्मविश्वास दृढ झाला. पाठांतर क्षमता, स्मरणशक्ती वाढण्यास मदत झाली. त्याबद्दल प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबईचे मनापासून धन्यवाद.

(सौ. अक्षता उपरे)

# कथासरिता नियमावली

- कथा दिनविशेष आधारित असावी.
- कथा कमीत कमी चार मिनिट व जास्तीत जास्त दहा मिनिटची असावी.
- कथा सादरीकरणापूर्वी कथा सरिता उपक्रमासाठी तयार करण्यात आलेला व्हिडिओ कथेच्या सुरुवातीला व शेवटी जोडणे अनिवार्य आहे
- कथा आठवड्यातील नियोजनाप्रमाणे उदा. सोमवार, मंगळवार, बुधवार मराठी शुक्रवार हिंदी आणि रविवार इंग्रजी मधून सांगावी.
- कथा सादरीकरण करताना सुरुवातीला दिनांक, वार, पंचांग, दिनविशेष आधारित कथा सांगावी.
- कथा सांगताना कथेला साजेशी चित्रे, चलचित्रे, व्हिडिओ यांचा समावेश असावा.
- कथा सादरीकरण करताना चित्रांसमवेत गोष्ट शब्द रूपात वाक्य रूपात (captions) लिहिणे आवश्यक आहे. यामुळे विद्यार्थी गोष्ट ऐकताना वाचन देखील करतील.